<u>प्रशासकिय मान्यता</u>

वार्षिक योजना २०१८-१९ (योजनातंर्गत योजना) राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकिय कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण योजना, <u>सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीबाबत.</u>

महाराष्ट्र शासन

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

शासन निर्णय क्रमांक : आकृवि-३९१८/प्र.क्र.११५/१५-अे,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : २३ एप्रिल, २०१८.

<u>संदर्भ</u> : -१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/ १२-अ, दि.२३ सप्टेंबर,२०११.

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक, अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३ दि.०२ एप्रिल, २०१८.

३) कृषि व प.दु. म. विभाग, शासन निर्णय क्र.अंदाज-२०१८/(प्र.क्र.५५/१८)२-अे, दि. ०६ एप्रिल, २०१८.

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य शासनातील सेवेत असलेल्या सर्व स्तरातील अधिकारी व कर्मचा-यांची कार्यक्षमता वाढवुन गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील सर्व कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याबाबत राज्य शासनाने दिनांक २३/९/२०११ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरण जाहिर केले.

या नुसार, तांत्रिक प्रशिक्षणाचा आराखडा विभागाने तयार केला असुन हा प्रशिक्षणाचा कार्यक्रम, योजनातंर्गत योजनेतुन राबवायचा आहे. यासाठी क्षेत्रियस्तरावरील अधिकारी व कर्मचा-यांच्या वर्गवारी नुसार तांत्रिक प्रशिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी, शासकिय कर्मचा-यांना प्रशिक्षण ही योजना (योजनातंर्गत) प्रस्तावित करण्यात आली असुन त्यानुसार **राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत, तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचा-यांना प्रशिक्षण (३४५१ २९६२) (१००% राज्य योजना) या योजनेस** विभागाच्या अर्थसंकल्पात सन २०१८-१९ करिता **रू २५.०० लाख,** अर्थसंकल्पिय तरतुदीस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

यानुसार, कृषि विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या प्रशिक्षणासाठी **राज्य प्रशिक्षण धोरणातंर्गत, तांत्रिक प्रशिक्षणासाठी शासकीय कर्मचा-यांना प्रशिक्षण (३४५१ २९६२) (१००% राज्य योजना) या योजनेस** विभागाच्या अर्थसंकल्पात सन २०१८-१९ करिता करण्यात आलेल्या **रू.२५.०० लाख,** अर्थसंकल्पिय तरतुदीस या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१८०४२३१५०९५२३००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Umesh Madhukar Madan

Digitally signed by Umesh Madhukar Madan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6a20cbbc812f8be8371fb8e96ab39865278090eca38793fc8e3967bd332d3272, cn=Umesh Madhukar Madan
Date: 2018.04.23 15:12:36 +05'30'

(उ.म.मदन)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक,कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
२) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल -१/२, (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
४) कृषि संचालक, (आत्मा) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) कृषि उपसंचालक (नियोजन), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६) कृषि सहसंचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) उप सचिव (२अे) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
८) उप सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) उप सचिव (व्यय-१/अर्थसंकल्प-१३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०) सर्व, संचालक/सह संचालक, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
११) सर्व, विभागीय कृषि सहसंचालक मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१२) सर्व, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मार्फत, आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
१४) निवडनस्ती -१५अे.